म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ८०७

भवभूती

कणरस परिप्लुत

नामक नाट-

कांतलि संविधानकाच्या

आधारें लिहिलेल्या

# संगीत रघुविलाप

नाटकांतलि

पद्यम[illegible]ग.

लेखक-कृष्णाजी दामोदर मळेकर,

प्रकाशक-महाराष्ट्रनाट्यसमाज पुणें.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टान्वयें

नोंदलें असे.

सन १९०६

[illegible]श्वर छापखान्यांत छापिलें.

किंमत २ आणे.

REFBK-0000337
REFBK-0000337

# विज्ञापना.

ऐऱ्हवीं तरी मी मूर्ख । जरी जाहला अविवेक ॥
तऱ्ही संत कृपादीपक । सोज्वळ असे ॥ १ ॥
तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ॥
करुनि घ्यावें हें तुमतें । विनवीत असे ॥ २ ॥
तऱ्ही पुरोहित गुणें । मी बोलिलों पुरे उणें ॥
तें तुह्मी माउलीपणें । उपसाहिजो जी ॥ ३ ॥

—श्रीज्ञानेश्वर महाराज;

कृष्णाजी दामोदर मळेकर.

# अर्पण पत्रिका.

हें पुस्तक

गुरुवर्य कैलासवासी

प्रोफेसर विष्णू बळवंत गोखले, एम. ए.

पुणें येथील महाराष्ट्र कॉलेजाचे माजी प्रिन्सिपॉल

यांस

त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नम्र शिष्यानें

प्रेमपूर्वक अर्पण केलें असे.

कृष्णाजी दामोदर मळेकर.

# संगीत रघुविलाप

## नाटकांतील

## पद्यमाला.

REFBK-0000337
REFBK-0000337
330
MU4

मुली:- पद- ( जगदीशा तात )

मृद्वंकीं विलसे धरणी-बाला । जोडोनी निजकर अं-
जनिचा सुत सन्मुख ठेला ॥ ध्रु ॥ मिथिलेश-सुता-
रमणा सदया रामा । रघुराया दिनकर-वंश-ललामा ।
गुण गाती तव मुनि सकल नमीती पद-युगलीला ॥ १॥
अर्पीती पुष्पांजलि या बाला । स्वीकारी रात्रिंचर-खर-
काला । कृष्णाला दे सुगिरा मति वाली रावण
काला ॥ २ ॥

मुली:- पद ( जाऊं कासाला० )

फुगड्या खेळूं या । चला गे । पिंगा घालूं या ॥ ध्रु ॥
झोंपाळ्यावरि बसुनी सुंदर गाणीं गावूं या ।
रम्य सरोवरिं हंसांच्या जल-केलीतें बघुं या ।
उपवनिं जावुनि कुसुमें वेंचुनि माला गुंफूं या ।
आपण मनरंजन करुं या ॥ १ ॥

कमला:- पद- ( चरण वंदीत० )

पाहण्या आजि या नाट्य-शालीं । रम्य, नव नाटका
॥ ध्रु ॥ निमंत्रिलें या नाट्योत्सुकशा रसिक जनांवलि-
ला । जनका येण्या, न कळे, भारी विलंब कां झाला? ॥
सुजन-तति ही उतावीळ झाली । ईशस्तवनाचिही वेळ
झाली ॥ १ ॥

मुली:- पद-( सुदिन आजी उदेला० )

नमन शंभो स्मरारी । फणिधर भवहरा करिति बाला
नव पदिं । कवि-सुरवर-मुनि-गण-चर-श्रुति-नुत

॥ धृ ॥ भाललोचना भवानीश हे कृपार्णवा । रजनि
पतिधरा गिरिकुमारिवरा । सदया अशिव हरी ॥ १ ॥
मुली:- पद-( हे प्रभो विभो अगाध० )
हे विधी-सुते पदांसि तव अम्हि नमितों । नव नाटक
या स्थळि करितों ॥ धृ ॥ पात्रांच्या वदनीं वाणी ।
येवूं दे मधुरा स्थानीं । त्वां आजि स्वयें येवोनी । कृति
न्यावि तडिस ही नमितों ॥ १ ॥
राम:- पद- ( काय मला भूल० )
क्लेश घेसि करुनी कां व्यर्थ सुंदरी । तनुला, कां खिन्न
तेंसि धरिसि अंतरीं ॥ धृ ॥ इच्छित नव्हतेच तुला
ठेवुनी पुरीं । जायासी, नच उपाय कांहिं सुंदरी । स्वा-
तंत्र्या होम-क्रिया नष्ट त्या करी । स्वांतिं धरी शांति सु-
दति प्राणसुंदरी ॥ १ ॥
राम:- पद-( गतवैभव झालों० )
कुलगुरुनें केला अनुग्रह हा ॥ धृ ॥ साधारण साधूचें
वच तें । होणारी कृति पाहुनि निघते । आद्य ऋषीची
वाणी वदते । तैशी करणी घडत अहा ॥ १ ॥
राम:- पद-( आत्म हृदया शांत० )
गुंतलां या हर्षिं सारे । बाल असासि तूं राज्य नवें हें
ह्मणुनी तुजला लिहीतसे रे ॥ धृ ॥ लोकरंजनीं न करी
तोटा । इतर धनाहुनि लाभचि मोठा । वागवि स्वमनीं
सुबोध हा रे ॥ १ ॥
राम:- पद-( अहो पाषाण-राजी० )
असे शुद्धाच जातीनें । हिला शुद्धा करायाला ।
नको कोणी, असे विमला । कुणी घ्यावें शुद्धतेला ।
तीर्थ-स्थानासि वन्हीला । धरावें ज्या सुकुसुमाला ।
शिरीं, चतुरें काय चरणें । चुरावें त्याच सुमनाला ॥१॥
सीता:- पद-( झाली ज्याची उपवर० )
शोभा आली आहे बहु या कर्णींच्या झुलपांनीं वदना
॥ धृ ॥ कोमल मांसल देह जयाचा, पाहुनि कमलें वि-

म. काव्य 23



कसित नयना ॥ १ ॥ गमती, प्रेमें दशरथ राजा पाही माझ्या प्रियकर रमणा ॥ २ ॥

रामः- पद-( किति कोमल तनु० )

महि-नंदिनि मम मन-रमणी गाधि-बाल हा । भार्गव मुनि हा, कुलगुरु हा, सखे पहा ॥ धृ ॥ भासे मंगल मजला । लग्न-काल हा आपुला । शोभे हा तव पाणी कंकणें पहा ॥ १ ॥

रामः- पद-( पूर्ण दैव कैकयिचें० )

धवल दशन रमणि-रम्य वदनिं विलसती । सुमनोहर प्रतनु विरल कुरल शोभती ॥ धृ ॥ कौमुदिसम अंगक हे ललित दीसती । वदन बघुनि लाजे तो यामिनी-पती । विभ्रम बघुनी माता मोद मानिती ॥ १ ॥

राम-सीताः- पद-( जय जय सुर० )

प्रणति करितों तुला तरणि-कुल-देवते ॥ धृ ॥ तूझिया कारणें कठिण तप नृप करी । तववरें उद्धरी भूप निज सुकुल तें ॥ १ ॥ सांब तुज शिरिं धरी । स्नान उदकीं हरी । सकल पापें करी । पूत तव नाम तें ॥ २ ॥

रामः- पद-( नजारिया मिला० )

अलस-लुलित तनु मृदु रम्य स्थानीं । ज्या, चालतां श्रांत झालीस वनिं ॥ धृ ॥ आलिंगोनी सांवरियेलें श्याम-मल-राजीं दाट । झोंपलिस तूं घालुनीयां अंकिं त्वदिय मृदु हात । ममकंठीं स्थळा त्या कसा मी विसरेन रमणी ॥ १ ॥

रामः- पद-( शारदे दासकामदे० )

सुंदरी या गिरीवरी जल तरंगातें । पाहण्या बैसलों काय तुजसि आठवतें ? ॥ या जलीं केलि सखि केलि रम्य स्थानातें । पाहोनि जाहला मोद बहुत चित्तातें ॥ सुरमणी एक दिनिं शयनिं पाणि पाणीतें । लावुनी गाल गालासि झोंपलों येथें ॥ यामिनी गेलि निज सदनीं नाहिं कळलें तें । बोलतां बोलतां काय तुला आठवतें ? ॥ १ ॥

सीताः- पद-( जन खुळावले० )

चरणिं प्रार्थितें । पुन्हा मजसि वाटतें ॥ धृ ॥ गंभिर रमणीय वनीं केलि करावी जावुनि । मंदाकिनि हिमजलांत होवुं पूत स्नान करुनि ॥ १ ॥

रामः- पद-( सखे शशिवदने० )

प्रिये मनरमणे श्रम-घर्म-बिंदुयुत घालि कंठिं कर गार ॥ धृ ॥ चंद्रकांतमणि-हार गमो मज । शचि पति किरणें स्त्रवित असा भुज । प्रियकर मृगनयने ॥ १ ॥

रामः- पद-(स्वार्थी ही प्रीति० )

कांती ही होय भुवनाची सु-रमणी ॥ धृ ॥ मौक्तिकमाला कंठीं गमते रमणीचा पाणी ॥ १ ॥ म्लान जीव कुसुमा फुलवीते सखि मधुरा वाणी ॥ २ ॥

रामः- पद-( किती [illegible]ले सुकोनी० )

रमणीस निवासचि खलसदनीं घडला । होईल खचित तें दूषण नांवाला ॥ हा धाक मानसीं माझ्या बहु पडला म्यां उपाय केलें दूषण जाण्याला ॥ परि दुर्दैवानें नेलें विलयाला । धिःकार असो मज कांहिं सुचे न मला ॥१॥

रामः- पद-( सुविहित जाहलें० )

अजवरि भुवनीं विमल चरित केलें या रविकुलिं जन्मा येवुनि ॥ धृ ॥ लोकमान्य जैसें नृपतींनीं करि न तसें जरि निंदितील जनिं ॥ १ ॥

रामः- पद-( आजवरी जनक )

पापि असा भानुवंशिं कुणि न जाहला । बालपणा पासुनि सखि-देह पोशिला ॥ धृ ॥ अन्याला देह मात्र भिन्न दीसती । छद्म करुनि काळाला देतसे सती । बकरीची ये न दया खाटिकाप्रती । दूषित होशिल स्पर्शें सोडि या खला ॥ १ ॥

रामः- पद-( या कोणि वाली जगीं )

जन्मूनि रविकुलिं ऐसा निर्दय झालों मी कैसा । ठेविलें जिनें विश्वासा मजवरि घालित तिज फांसा ॥ सुकुमार

अवषव जीचे तिजला देत असे कुदशा । मम प्राण सखी
विश्रांति जिवाची सोडितसे सहसा ॥ १ ॥

रामः– पद–( प्रभो अनाथ पालका )

क्षमे तुझ्या कुमारिला । वनांत टाकितों, इला ॥ ध्रु ॥
तुझ्याविना कुणी नसे । सुरक्षणा करी; नसे । दया, वदा-
वया असें । नसेच लाज या मला ॥ १ ॥ सुरम्य सुतनु
कोमला । ममांक झोंपली तिला । मदीय स्वांतशांतिला।
त्यजोनि राम चालला ॥ २ ॥

सीताः– पद– ( न बोलो तारा तारा )

जिवलगा गेला त्यजुनी प्रियेला ॥ ध्रु ॥ आलें न्यावयाला
कोण जगती पाला । मला एकटीला ॥ १ ॥ विपिनीं मज
ला । येइन वदला । विसरुनी गेला । कोप तुम्हां आला।
कांहो दयाळा ? ॥ २ ॥

सीताः– पद ( शिव शंकर गिरिजा )

जननी जगदंबा चरणा । वाल्मीकी मुनिच्या चरणा ।
रघुवंशमणीच्या चरणा । सुरवर शिव चरणा ॥ धृ ॥
गाधिजचरणा । धरणी·रमणा । करित्यें जोडुनियां कर
सकलां नमना ॥ १ ॥

रामः– पद– ( तव मुख निरखुनि )

तरुवरि मधुरव रमणिय शकुंत । करिति हरिण– शिशु
धांवति वनांत ॥ धृ ॥ याच गिरि--शृंगीं निज सुंदरि मोर
घेवुनी राहती । रम्य प्रांतीं नदि--जल--निर्झर हळुं हळुं
वहात ॥ १ ॥

रामः– पद– ( वसंतीं बघुनि )

शरिरीं विष रस या भरला । वेगें शल्यावयवाचे जणुं
क्षणिं अंगीं या भरला ॥ मर्मीं व्रण फुटुनी जमला। जैस
शोकानल विकल करी मोहुनियां मजला ॥ परिचित या
वन भूमीला । सुहृदासम निरखावी पुनरपि वाटे
चित्ताला ॥ १ ॥

रामः– पद– ( नाट्यशाला कोंवि )

कालमानें । हीं बहु झालिं रानें ॥ धृ ॥ विरल, होतें उ

दक जेथें जाहलीं पुलिनें तिथें । नविन वन हें गमत, सुचवी असे तें हें शैल तें ॥ १ ॥

रामः- अपूर्ण साकी

पंचवटीके भगवति माते तव सत्कार न करितां ।
उल्लंघन करि राम तुझें हा भगवानाझे करितां ॥ १ ॥

सीताः- पद-- ( सुलभ मनिं गणा न )

रुचिर तनु कृशा किती जहाली । पांडुरता आली गालीं ॥ धृ ॥ वदनानें रमणियता सखये सुरम्य सोडियली॥१॥

सीताः- पद-- ( पांडु नृपति जनक )

नेत्रकमळ मिटुनि नाथ झाला पाही मूर्छित । तमसे तुजला विनवित । त्यासि आंवरी ॥ १ ॥

रामः- पद-- ( ७ ) कालावि जी )

रामे माते सखी-पाणी । असौख्या स्पर्श ने हरुनी ॥ धृ॥ चंद्रकरांकुर रस लावियला तनुसी जणुं पिळुनी । शीतल लागे मोह करीतो मजला जीववुनी ॥ १ ॥ संतापें जी मूर्च्छा आली तिजला घालवुनी । आनंदें दे पुनरपि जडता मन्मतिला, पाणी ॥ २ ॥

रामः- पद-- ( निर्धनतेनें लज्जा )

निज भार्येते श्रांत पाहुनी वत्स पहा सत्वरी । करी जल-सेक कसा तीवरी ॥ छत्रापरि हा पुष्कर पत्राचि तिज-वरि पाही धरी । नरी-श्रम-दुःख स्नेहें हरी ॥ कमल-नाल- खंडें लीलेनें तुंडें उपडोनी । देई दंतांनीं चघळुनी॥ श्रम न पडावे तिज भक्षाया म्हणुनि ग्रास करुनी । देई, रमवी निज कामिनी ॥

सीताः- पद-( हेतु अलौकिक हा )

व्यर्थ सखे झालें । प्रसवुनी पुत्रांस, रम्य वदनांस प्राण-नाथें नच देखियलें ॥ धृ ॥ घेवुनि अंकीं आनन नच चुं-बियलें । प्रियबालां मोदें कडिये नच खेळविलें । नच शिशु-लीलेला । पाहिलें ॥ १ ॥

वासंती:- पद ( तुम्हि व्यंग अंगिचें )
नव पंख दीसती ज्याचे । शोभतसे शिरिं रम्य तुरा हा निज प्रिय रमणिसमोर । कदंब-तरुवरि मत्त होवुनी तांडव करि हा मोर ॥ १ ॥

वासंती:- पद-( स्वभावाच्या साध्या भोळ्या )
परिचय या स्थानाचा रामा असेल तूजला कदलिवनांतिल शीलातल हें शयना तूजला ॥ धृ ॥ आलें कामा सखिसह विमला रामा बा येथें । देत बसे तृण खायालागीं कोमल हरिणांतें । सोडुनि जातचि न्हते मृग ते या सुंदर स्थानाला ॥ १ ॥

वासंती:- पद-( घेवुनि ये पंखा )
फल मधु कुसुमांनीं तरु-तति ही रामातें वनीं ॥ धृ ॥
पूजो, हे पवना शीतल वाहें-यां श्रमि ऐशा रमवावें॥१॥
अखिल शकुंतांनीं सुंदर मधुर रवानें गावोनी रमवावें॥२॥

वासंती:- पद-( सुजन हो विनावि० )
अहृदय कैसा तूं झालासि रामा ॥ धृ ॥ कुसुमाहुनि जी अति सुकुमारी । गर्भवती जी ती कांतारीं । काशि टाकियेली रामा ॥ १ ॥ प्राणाहुनि जी प्रिय रे तुजला । मोकलिलें तिस, कोठें गेला ? । तिजविषयींचा प्रेमा ॥ २ ॥

रामः- साकी
स्याड मगापरि चंचल दृष्टी सखिची ती तनुलतिका ।
कुसुमें स्तवण्या शक्य नसति तें होइल इतरातें कां ।
व्याघ्रादिक पशुंनीं । खचित ती गिळिलि असावी रानीं॥

रामः- पद- ( किती तरी कोपी )
करुं किती शोका सहन हें हो न आतां ॥ धृ ॥ मम हृदय उले शोकानें हें । शरीर हें कां दुभंग नोहे । शोकाग्नीची ज्वाला नच हे । भाजी आंतुनि जाळित तनु हे ॥ १ ॥ मूर्च्छा काया विकल करीते । सोसुं किती मी या विरहातें । प्राक्तन भेदी जरि मर्मातें । हरित कां न मम प्राणचि ते हे ॥ २ ॥

दा. क्र. ... (स्थन

रामः- पद- ( सुखाशा कांहिं )
वियोगा साहवेना या वनीं त्यजिलें । प्रियेला सौख्य या जगतावरी नुरलें ॥ धृ ॥ रडे रानीं बघोनीयां प्रिया वस्तू थिरा धरवे न, कोठें तूं अससि विमले ॥ १ ॥

वासंतीः- पद- ( जरठास तरुण हो )
उभि होति तव प्रिया गोमटी । निरखाया गोदा-तटीं॥धृ०॥ जलिं हंस केलितें, पाहुनी । तव खिन्न वदन त, जोडुनी कर विनवियलें तुज उभी राहिली घालुनी कटिला मिठी ॥ १ ॥

रामः- साकी
अमृतमय प्रलेपनांनीं तनुही सारविली कीं वाटे । सखि-स्पर्शाचि हा मोहवितो मज भाग्यचि माझें मोठें । प्रिय-सखि वासंती ।

पद- ( आलि कालिं या मज )
लग्नकालिं जो कर सवलयसा ॥ धृ ॥ धरिला स्वकरें ज्यां स्पर्शानें अमृतसम तो गमतो मधुसा ॥ १ ॥ दैवें मजला प्राप्त जहाला पुनरपि रमणी- कर सुखकरसा ॥२॥

रामः- पद- ( बिंबाधरा मधुरा )
चंद्राननें लटिका चटका हृदयासि लाविला, घटिका । कल्पासमान गमे मला वचनामृत हा दे घुटका ॥ १ ॥

वासंतीः- पद ( निजमुख रक्षाया )
हे धरणी बाले । गेलिस कोठें रमणी प्रिय सुशिले ॥ धृ ॥ शून्या जगती ही गमे या मजला भान नुरे । पाहुं कुठें मी सांग तुला गे एकवार दे दर्शन विमले ॥ १ ॥

वासंतीः- पद- ( तूं टाक चिरुनि ही )
हे करुण रसाचे भेद शोक आनंद । सुख मोह भास; भोंवरे बुडबुडे लाटा ऐसे भेद ॥ धृ ॥ वारींचे दिसति अनेक । जल दिसे जरी तें एक । काल स्थितीप्रांत अनुस-रुनीयां होती नाना भेद ॥१ ॥

वासंतीः- पद- ( वंदे नैसुर वृंदार्चित )
देवी धरणी मंदाकिनि वाल्मीकी तो देवो मुनिवर ॥ धृ ॥

वसिष्ठ कुल गुरु हिमनगजा । मंगल तुजला अशिवा ह-
रुनी हिमनगजावर ॥ १ ॥

सीताः— पद– ( मूर्तिमंत भीति उभी )

प्राणनाथ मूर्ति क्षणीं या वनासि सोडुनी । चालली,
कशी मिळेल निरखिण्यासि लोचनीं ॥ धृ ॥ रम्यमूर्ति
प्रेमभरें पाहुं दे मला सखे ' घाइ कां करीसि थांब जरा
ग थांब साजणी ॥ १ ॥

भांडायन– कटाव.

गुरुजींच्या आश्रमाचि कांती । रम्या दिसते पहा आज
किती । अतिथि जनाची झाली दाटी । गुरुजीला न मिळे
विश्रांती । चाकर सगळे गडबड करिती । ज्यांच्या डोई
चे कच पिकले । म्हातारे म्हातारे जमले । अतिथी आले
उत्तम झालें । अनध्याया कारण झालें । आम्हा खेळा-
यास मिळालें । पाकशाळि घमघमाट सुटला पक्का-
न्नांचा, या धेनूला । खायाला या मृगावलीला । मिळेल
जावुं चला । आपण आणि खेळायाला ॥ १ ॥

जनकः– पद--( विधि तनये पाव )

बालकिं या आकृती ॥ धृ ॥ सूर्यवंश मणिची नंदिनिची
पूर्णपणें प्रतिबिंबित ही, दिसत असे तशि द्युती ॥ १ ॥
भासे, विनयही तैसा साजे पाहुनियां धनुधारि मुला
नवल गमे मजप्रती ॥ २ ॥

मुलें– पद--( अनिवार मनुज )

मोठें असे त्या शेंपुट तें वरचेवर हालवितो । ग्रीवा दीर्घ
जटाल तया खुर चार चाळवीतो । तृण खातो लेंड्या तो
टाकीतो फुरफुरतो । चल दाखवीतों चल चल सत्वारि
जाइल दूरचि तो ॥ १ ॥

लवः– पद–( मज समीप किमर्थ )

ऋषि-कुमार बळेंच नेती । मला करा क्षमा, प्रणती॥ धृ ॥
पाणिद्वय जोडुनि करि चरणा गुरुजन हो ओढीती ॥ १ ॥

लवः- पद-( चंद्रमंडल भग्न )
महितलावरि क्षात्र-नंदन। नाहिं वदतां कसें भाषण। दाखवीतों हया बांधुन। क्षात्र-करणी मी ॥ १ ॥ दाविता ऋषि-कुमारातें। भीति, योग्य न क्षत्रियातें। वीर पुरुषा तीव्र शस्त्रें। दाखवा समरीं ॥ २ ॥

मुलें- पद-( त्यांडचे चालीवर. )
अश्वा सोडी सोडी चल कुमरा। धीरा न त्यजा जावूं त्वरित घरा। हा हय आह्मां नलगे, ह्मणसी यासि धरा-चल कुमरा। तो बरा या करिल खरारा पाणी पाजिल तृण-भारा। कोण वनीं जावुनि आणुनि देई सोडुनि या अविचारा। देवीला वृत्तांत चला सांगु करा बहुत त्वरा ॥ १ ॥

लवः- पद-( मनिं [illegible] तया नच लेश. )
तुज कुणी छळियलें सांग मला। कर जोडुनियां विनितों तुजला। बोलसि कां नच सांग मला ॥ ध्रु ॥ नयन जला कुल कां तव होती। माते कथिसि न कां मजला ॥ १ ॥ शासन करितों त्या अधमाला। बोल बोल माते सुवचाला ॥ २ ॥

लवः- पद-( निज मति राखिन )
धरि भय कांहिं न जननी। मनिं रिपु-दळ गाणि नच शल सम वच मदीय झोंबलें मनीं ॥ ध्रु ॥ सैनिक जरि हे धांवुनि येती घेवोनी चापातें राहीन मी उभा रणांगणीं॥

सीता- पद-( ईश्वर पंकज जंवि )
सोडुनि देई अश्व अकारण संकट ओढवलें। तुज गमत भय न कसलें सुभट आले॥ तुजवरि धांवुनियां सगळे। उपवन त्यांनीं वेढियलें। बाला त्वादिया आतां होइल काय दशा न कळे॥ १ ॥

लवः- पद-( धारि आंवरुनी )
मम चाप-शरावलि संगरीं। सुविजय मिळविल आशिर्वचनें वरद पाणि ठेवी शिरीं॥ धृ ॥ रिपू-चमूती महा प्रबल जरि घेइन करुनि न मोहरी ॥ १ ॥

 वा.ग्रा.य. 83

सीताः- पद-( कधि करिती लग्न माझें )
जगदंबे पाठिराखी होइं वरो याजला ॥ धृ ॥ अर्पुनी । विजय दायिनी । जय-श्री रणीं । सुकंठीं माला ॥ १ ॥ सोज्वला । अशा कीर्तिला । मिळावि रघुकुला । भूषवी बाला ॥ २ ॥ कोमला । चुंबु दे मला । त्वरित भेटिला । येइं प्रिय बाला ॥ ३ ॥

चंद्रकेतुः- पद -( तुजविण मी हैराण )
किशोर करि शरमार । समरीं रिपु भारी विपुलाहि कांपत थरथर ॥ धृ ॥ बाला भटांनीं रीण वेढियलें बहु एकाकी परि नच आटोपे तो सकलां । रघुवंशांकुर भूव-रि वाटे कुणि तरि अवतरला । बघुनी यातें फुटतो मनिं प्रेमांकुर ॥ १ ॥

चंद्रकेतुः- पद-( मरण म्हणुनि )
कुमर कंदनांगणीं विशाल द्विरद-मस्तका ॥ धृ ॥ फोडी उडवी कितीक वीर-शिरें अंबरीं पहा कुमार-कौतुका ॥ ॥ १ ॥ सैन्य नसे वारु नसे स्यंदनही एकटा । असुनिहि शर सुटति बहुत बघ प्रतोद-धारका ॥ १ ॥

चंद्रकेतुः- पद-( मम लालस कर्णीं मंजुळ. )
तो भूमि संगीं । मृग-चर्म आंगीं । तुम्हि वाहनीं । तुमच्या भटांणीं । कवचेंहि आंगीं । एकला रणीं ॥ धृ० ॥ अगणित तुम्ही, प्रवयस बालक तो जिंकाया त्यातें । विषम संगरीं सिद्ध जहाला योग्य न शूरांतें । धिःकार तुम्हां सकलांस आम्हां या न या रणीं ॥ १ ॥

लवः- पद-( शरणागत नाथ. )
शशिच्या उदया बघुनी जसा गमे कमलिनी प्रति मोद हे। मद्भुज समरा फुरफुर करिती पाहोनी यातें वाटे । धनुसि धाइ अति करीं धरण्या मम पाणि हे ॥ १ ॥

पद-( राम स्मरावा राम )
वीर्य असे वाणींत । द्विजाचें ॥ २ ॥ क्षत्रिय कुलजांचा विक्रम बा वसतो या पाणींत ॥ ३ ॥ विप्र जिंकिला भूपें केला काय पराक्रम यांत ॥ ३ ॥

पद-( रणीं एक येवो. )

भूपतीची कृती थोर बहु मानिती । मारि जारि स्त्री प्रती नृपति जगतीं ॥ धृ० ॥ वालि-निधनीं करी कौशला मानिती । उत्तमा कृति तरी विफल महती । विदित मजला कथी नच कुतूहल गमे । थोर चरितींच रत लोक होती ॥ १ ॥

पद-( सदर )

रणा योग्य ऐशा स्थळीं जावुं या या क्षणीं । आजि घन घोर संग्राम करुनी ॥ धृ० ॥ दाखविल बाल हा क्षात्र-नंदन-करणि । अशि न काढी मुखांतूनि वाणी ॥ १ ॥

राम व चंद्र दिंडी

अर्क-कुल-चंद्रा कोमला कुमारा । येइ येई धनु धारका सुवीरा । चंद्रकेतू हा जोडुनी कराला । पादकमलां करि प्रणति हे दयाला ॥ १ ॥

लव- पद ( काय घोर त्या वनीं असुर. )

स्नेह-शांति-प्रीति-भक्ति-आसरा असे । मजसि मूर्तिमंत धर्म-मूर्ति गमतसे । मम मना मधील वैरभाव जातसे । विलय-पंथिं, प्रेम-भाव हृदयिं येतसे । परवश झालों घेतां दर्शन मी याचें । नवल गमे मजला हें, जैसें तीर्थाचें । महिमान विचित्र जगीं तसें थोराचें । लोकिं या असे ॥ १ ॥

राम- पद-( लाजवील ही सुर० )

इंद्रनील सम सुनील कांती । पाहुनि उपजे हृदयीं प्रीती ॥ धृ० ॥ घन गर्जितसा शब्द करीतो । पुलकें माझ्या तनुतें भरितो । मधुवच देई हृदया शांती ॥ १ ॥

कुश- पद-( निशिदिनिं हरिपद० )

तरणी-कुल जन्मुनि भूषविलें । ज्यानें अभयातें दिधलें । देवेंद्रा रिपुला वधुनी जागें धन्य । त्यासिं कंदन घडलें ॥

दिंडी.

करुनि गुण गाया योग्य अशा स्थानीं । खचित झाली

रममाण मुनी-वाणी । दिसे आनंदाचीच हे सु-खाणी ।
करी वंदन कुश जोडुनियां पाणी ॥ १ ॥

राम- पद-( मतिमतिही० )

मन कां सुखावें बालका । बघुनी गमतों सखा ॥ धृ० ॥
प्रेमा उपजे हृदयीं माझ्या बघुनी धनुधारका ॥ १ ॥

लव- पद.

या आसनावरी । निबिड तरुंच्या शीतल छायेखालीं
बैसा असति तरणि-किरण प्रखर ह्मणुनि क्षणभरी ॥ धृ० ॥
रक्तता सुवदन धरी धर्म-बिंदु गळताती । तळपती
ललाट-प्रांतिं मौक्तिकापरी ॥ १ ॥

राम- पद-( सहज कशी खेळविते. )

रुचिर तनू योग्य असे श्रीतें ॥ धृ ॥ स्थान विलासा
वास कराया वांछिति गुण [illegible]ये ॥ १ ॥ प्रमुदित होई
मानस माझें निरखुनि विनयातें ॥ २ ॥

पद-( पुनरपि नयना )

प्रियकर सखिचें तें मुख दिसतें । गालीं ज्या सुरुची
रम्य गमे चंद्र-खंड जणुं तें ॥ धृ ॥ अंकरहित तरि ललाट
धर्में अंबु निघे तेणें भाळीचें कुंकुम पुसलें तें ॥ १ ॥

सीता- पद-( रडसि काय ह्मणुनि )

मंदभागिनी वनांत पडलि एकली । कुणि न जवळि
आस कांहिं नाहिं राहिली ॥ धृ ॥ प्रसव-वेदना तनूसि
फार ताप दे । निकट प्रांति हिंडतीहि हिंस्र श्वापदें ।
सोसवे न कष्ट देह टाकितें जलीं ॥ १ ॥

पृथ्वी- पद-( शिशुपणीं गमे हे )

निजकरें धरीला बाळपणीं जो पाणी । मानसी मुळी तो
नाणि जनक नच सुकुल वन्ही मातें न आणी निजा वाणि
तो मनीं ॥ १ ॥

राम- पद-( वारुणी दुजी गमेच )

जाइ हें नृपा बघोनी हृदय भेदुनी चंचला जणों कडा-
डली असे खचीत अंबरातुनी ॥ ध्र ॥ मम अदय हृदय

नच बघुनि सुंदरी-स्थिति द्रवतें । मग दयाळु मुनिनाँ बघोनि मजला तुह्मांस करुणा कां येते ॥ १ ॥

सूत्रधार- पद

नमन करि गिरिज कुमर चरणा । सदय हे श्रीअंबासुत कृत रिपुकदना ॥ धृ ॥ आश्रय घ्यावा या नव कवना हे लंबोदर मूषकवहना ॥ १ ॥

पद--( हरहर स्थिती )

शंकर तुह्मा सदा सुख देवो । संकट विलया नेवो ॥ धृ ॥ कैलासीं गिरिजे सवें स्मर-रिपू सारीपटा खेळतो । ज्याचा वास सदा स्मशानि गरला घेई जगासाठिं तो । कंठा नाग धरी, ललाटिं शशिला, नंदीवरी शोभतो।ऐसा जो शिव सांब धूर्जटि तया पुष्पांजली अर्पितों ॥ १ ॥

राम- पद--( आंवरि आंवरि रे )

सुंदरि टाकुनि गे या सकळा । चाललीस या हतभाग्याला ॥ धृ ॥ जगति राहुं मी अतां कश... याला ॥ १ ॥

REFBK-0000337
REFBK-0000337

वाल्मिकी- पद

घेइं ही रघूवरा सु-पुण्यकारिणी ... धरा-सुनंदिनी । सूर्य वंशजांचि कीर्ति ... राहि दक्ष, वरुनियां नया, प्रजावनीं ॥ १ ॥

भरतवाक्य- पद--( उगवो हा वैभव )

गंगेपरी सुमनोहर त्रिजगतास मंगल्या कथा ॥ धृ ॥ पापापासुनि रक्षिति । श्रेयासी जी वितरति । संत धरुं तही चित्ती । सुखद सर्वथा ॥ २ ॥ भवभूतीची वाणी-करुण रसाची खाणी । पाषाणीं जी आणी । खचित आर्द्रता ॥ २ ॥ तरणी-कुल-मुकुट-मणी-नाम वसो सतत स्मरणिं । कृष्ण-कृती रसिकजनीं मिळवुं मान्यता ॥ ३ ॥

समाप्त.

क्र. 336